# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 27.07.2024** **वार – शनिवार**

---

**पूर-कॅमेरे**

पुण्यात पुराचं पाणी शिरणाऱ्या भागात सीसीटीव्ही आणि पाऊस मोजणी यंत्रं बसवली जातील, असं पुणे महापालिका आयुक्त डॉक्टर राजेंद्र भोसले यांनी आज पत्रकार परिषदेत सांगितलं. पुराच्या धोक्याविषयी नागरिकांना जागृत करण्यासाठी अन्य यंत्रणांची देखील मदत घेतली जाईल असं ते म्हणाले. पाणी शिरलेल्या भागात स्वच्छतेची कामं सुरू आहेत. अन्य क्षेत्रीय कार्यालयांमधून अतिरिक्त मनुष्यबळही उपलब्ध करून दिल्याचं डॉक्टर भोसले यांनी सांगितलं.

**बांधकामे**

पुण्यात दोन दिवसांपूर्वी आलेल्या पुराच्या पार्श्वभूमीवर मुळा मुठा नदीकडेला पूर रेषेच्या आत असलेल्या बेकायदेशीर बांधकामांवर कारवाई करावी तसंच नव्यानं परवानगी नाकारावी, अशी मागणी विविध सामाजिक आणि स्वयंसेवी संघटनांनी केली आहे. नदी सुधार योजनेच्या अर्धवट कामांमुळं नदीची पाणी वाहून नेण्याची क्षमता कमी झाली असून त्यामुळं देखील पुराचा धोका वाढला असल्याचं निरीक्षण तज्ज्ञांनी नोंदवलं आहे.

**हरित-शहर**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका लवकरच हरित शहर कृती आराखडा तयार करणार आहे, यामध्ये पर्यावरणीय शाश्वततेसाठी आवश्यक गोष्टींचा तपशील असणार आहे. या उपक्रमात APEX या ऑनलाइन सॉफ्टवेअर साधनाचा वापर करून हरित शहर मूल्यांकनातील निष्कर्ष प्राप्त केले जातील. हे सॉफ्टवेअर कार्बन आणि ऊर्जा बचत आणि खर्च यासारख्या प्रमुख निर्देशांकांवर आधारित हरित शहर कृती ओळखण्यात, त्याचं मूल्यांकन आणि प्राधान्य देण्यात महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. या उपक्रमामुळं शाश्वत उपायांची अंमलबजावणी करण्याच्या दिशेनं पिंपरी-चिंचवड शहराच्या वाटचालीस गती मिळणार आहे.

**टिळक पुरस्कार**

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या, लेखिका आणि राज्यसभा सदस्य सुधा मूर्ती यांना लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कारानं गौरविलं जाणार असल्याची घोषणा लोकमान्य टिळक स्मारक ट्रस्टचे विश्वस्त डॉक्टर रोहित टिळक यांनी आज पत्रकार परिषदेत केली. एक ऑगस्ट रोजी लोकमान्य टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त नवी दिल्लीतील महाराष्ट्र सदनात आयोजित एका सोहळ्यात सुधा मूर्ती यांना या पुरस्कारानं गौरविलं जाणार आहे. मूर्ती यांनी ग्रामीण भागातील विकास तसंच साहित्य आणि सामाजिक क्षेत्रात भरीव योगदान दिलं आहे. लोकमान्यांच्या चतु:सूत्रीतील स्वदेशीच्या अनुषंगानं त्यांनी मानवी आणि सामाजिक विकासासाठी महत्त्वाची भूमिका बजावली. या पार्श्वभूमीवर सुधा मूर्ती यांची यंदाच्या लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कारासाठी एकमतानं निवड करण्यात आली, असं टिळक यांनी सांगितलं.

**व्याख्यान**

महात्मा फुले कृषी विद्यापीठातील विद्यार्थ्यांसाठी 'प्रेरणा' या शीर्षकाखाली विशेष व्यक्तिमत्त्व विकास कार्यशाळेचं आयोजन काल करण्यात आलं होतं. प्रमुख वक्ते विश्वकर्मा तंत्रज्ञान संस्थेचे माजी अधिष्ठाता प्राध्यापक डॉक्टर मकरंद उपकारे यांनी विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्व विकासाचे मंत्र सांगितले. विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला वाव देणं, त्यांच्या जीवनात सुसंवाद आणि

सामाजिक कौशल्यं विकसित करुन त्यांना सर्वांगीण अधिक सक्षम बनवण्याचा उद्देश असून त्यासाठी विविध सत्रांचं आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉक्टर महानंद माने यांनी दिली.

**रेल्वे**

पुणे रेल्वे विभागातील दौंड स्थानकात तांत्रिक दुरुस्तीसाठी 29 जुलै ते 1 ऑगस्ट दरम्यान ब्लॉक घेण्यात येणार आहे. त्यामुळं 20 हून अधिक गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत. तर काही गाड्या इतर मार्गानं वळवण्यात आल्या आहेत. या दरम्यान दौंड-इंदूर एक्स्प्रेस पुण्यापर्यंत धावेल आणि पुण्यातून सुटेल. पुणे-सिकंदराबाद, पुणे-सोलापूर, पुणे-बारामती, पुणे-दौंड पॅसेंजर, सोलापूर-दौंड, हडपसर-सोलापूर, अमरावती-पुणे, पुणे-हरंगुळ या आणि इतर गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत.

**सचिव**

कृषी आयुक्तालयाच्या अंतर्गत कार्यरत पदं आणि काळानुरूप नवीन पदे निर्माण करून विभागाच्या पुनर्रचनेबाबतचा प्रस्ताव त्वरीत दाखल करण्याच्या सूचना कृषी विभागाच्या प्रधान सचिव व्ही. राधा यांनी दिल्या आहेत. कृषी सचिव पदाचा पदभार घेतल्यानंतर व्ही. राधा प्रथमच पुण्यात आल्यानंतर कृषी विभागाच्या आस्थापना विभागाचा आढावा घेताना त्या बोलत होत्या.

**अनधिकृत**

पुणे जिल्ह्याच्या हवेली तालुक्यातील कदम वाकवस्ती इथं अनधिकृतरित्या किटकनाशकं खरेदी-विक्री व्यवसाय आणि साठा केल्याचं समजल्यावरुन पुणे कृषी विभागानं सापळा रचून धडक कारवाई केली. या प्रकरणी लोणी काळभोर पोलिसांनी गुन्हा दाखल करुन एकाला अटक केली आहे. अवैध किटकनाशकांचा साठा जप्त करण्यात आला आहे.

**साथरोग**

पुणे शहरात पावसामुळं जागोजागी पाणी साठून जलजन्य आजार वाढण्याचा धोका निर्माण झाला आहे. विशेषत: लहान मुलं आणि ज्येष्ठांना या आजारांचा त्रास होऊ शकतो. त्यामुळं नागरिकांनी काळजी घ्यावी, असं आवाहन पुणे महापालिकेच्या आरोग्य विभागानं केलं आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज दिवसभर ढगाळ वातावरण होतं आणि पावसाच्या सरी अधून-मधून पडत होत्या. उद्याही असंच हवामान राहून घाटमाथ्यावर मुसळधार पावसाचा इशारा पुणे वेधशाळेनं दिला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**